महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

(महाराष्ट्र शासन उपक्रम)

सीआयएन : यु४०१०९एमएच२००५एसजीसी१५३६४५

दुरध्वनी क्र. २६४७४७५३ (वै)/२६४७४२११ (का)
फॅक्स क्र. २६४७२३६६
ईमेल : cecomm@mahadiscom.in
संकेतस्थळ : www.mahadiscom.in

प्लॉट क्र. जी-९, प्रकाशगड
प्रो. अनंत काणेकर मार्ग,
वांद्रे (पूर्व)
मुंबई- ४०० ०५१

**पीआर-३/सबसिडी/९७९** **दिनांक:१२.०१.२०१५.**

# वाणिज्य परिपत्रक क्र.२३७

**विषय :-** महावितरण कंपनीच्या कृषी ग्राहकांना वीज दरात सवलत देण्याबाबत.

**संदर्भ :-** १) शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१३/प्र.क्र.२७८ (भाग-१)/ऊर्जा-५, दि.२९.१.२०१४.
२) वाणिज्य परिपत्रक क्र. २१८ दि.१८.२.२०१४.
३) संकीर्ण-२०१३/प्र.क्र.२७८ (भाग-२)/ऊर्जा-५ दि.२९.३.२०१४
४) शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१३/प्र.क्र.२७८ (भाग-३)/ऊर्जा-५, दि.२२.१२.२०१४.

मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या सप्टेंबर -२०१३ च्या आदेशानुसार घरगुती (० ते ३०० युनीटपर्यंत), औद्योगिक व कृषी ग्राहकांच्या वीज दरात वाढ झाली. शासनाने शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१३/प्र.क्र.२७८ (भाग-१)/ऊर्जा-५, दि.२९.१.२०१४ नुसार वरील ग्राहकांना दिलासा देण्याकरिता सवलतीचे वीज दर लागू केले. सदर सवलतीपोटी महावितरण कंपनीस शासनाकडून फेब्रुवारी २०१४ पासून अनुदान देण्यात येत होते. शासन निर्णयाच्या अनुषंगाने सवलतीचे दर लागू करण्याबाबत वाणिज्य परिपत्रक क्र.२१८दि.१८.२.२०१४ अन्वये सर्व क्षेत्रिय कार्यालयांना निर्देशित करण्यात आले होते.

शासन निर्णय संदर्भ क्र. १ व ४ (उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, संकीर्ण-२०१३/प्र.क्र.२७८ (भाग-१)/ ऊर्जा-५ दि.२९.१.२०१४ व संकीर्ण-२०१३/प्र.क्र.२७८ (भाग-२)/ऊर्जा-५ दि.२९.३.२०१४) अन्वये वीज दरात देण्यात येत असलेली सवलत कृषी ग्राहकांव्यतिरिक्त इतर ग्राहकांसाठी डिसेंबर २०१४ पासून रद्द करण्यात येऊन कृषी ग्राहकांबाबत वीज दरातील सवलत यापुढेही कायम ठेवून खालीलप्रमाणे सवलतीचे वीज दर लागू करण्याचा शासनातर्फे निर्णय घेण्यात आला आहे.

| वर्गवारी | स्थिर आकार (रु./अश्वशक्ती / महिना) | ऑक्टोंबर२०१२ च्या शासन निर्णयानुसार कृषी ग्राहकांसाठीचे सद्याचे वीज दर | सवलतीनंतरचे वीज दर | शासनाचे द्यावयाचे अतिरिक्त अनुदान |
|---|---|---|---|---|
| उच्चदाब - कृषी | ५ | १५५ (पैसे/युनिट) | ९२ (पैसे/युनिट) | ६३ (पैसे/युनिट) |
| उच्चदाब-५ उपसा जलसिंचन योजना | ५ | १३७ (पैसे/युनिट) | ७२ (पैसे/युनिट) | ६५(पैसे/युनिट) |
| लघुदाब कृषी | | | | |
| ० ते ३ अश्वशक्ती (मीटर असलेले) | ५ | १०३ (पैसे/युनिट) | ५५ (पैसे/युनिट) | ४८ (पैसे/युनिट) |
| ३ अश्वशक्तीपेक्षा जास्त (मिटर असलेले) | ५ | १३३ (पैसे/युनिट) | ८५ (पैसे/युनिट) | ४८(पैसे/युनिट) |
| ० ते ३ अश्वशक्ती (मीटर नसलेले) | - | ११२-१५२ (रु./अ.श./महिना) | ८५-९४ (रु./अ.श./महिना) | २७-५८ (रु./अ.श./महिना) |
| ३ ते ५ अश्वशक्ती (मिटर नसलेले) | - | १२८-१६८ (रु./अ.श./महिना) | १०१-११० (रु./अ.श./महिना) | २७-५८ (रु./अ.श./महिना) |
| ५ अश्वशक्ती आणि त्यापेक्षा जास्त (मिटर नसलेले) | - | १४६-१८७ (रु./अ.श./महिना) | ११९-१२९ (रु./अ.श./महिना) | २७-५८ (रु./अ.श./महिना) |

शासन आदेशाप्रमाणे कृषी ग्राहकांची वीज बिलांची आकारणी सवलतीच्या दरात करण्यात आल्यावर शासनावर पडणा-या आर्थिक भाराच्या रकमेची परिगणना माहिती व तंत्रज्ञान विभागाने करावी जेणेकरुन शासनाकडे प्रतिपूर्तीच्या रकमेच्या पुढील कार्यवाहीसाठी प्रस्ताव पाठविण्यात येईल. सदर सवलती सोबतच दुष्काळग्रस्त भागाकरीता शासनाने जाहिर केलेली सवलत सुध्दा दुष्काळग्रस्त कृषी ग्राहकांना लागू राहिल.

12.9.15

**मुख्य अभियंता (वाणिज्य)**

**प्रत सस्नेह रवाना :-**

१) सर्व मुख्य अभियंता, सं व सु परिमंडळ (महावितरण)

२) मुख्य महाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान), महावितरण, मुंबई.

-- आपणास कळविण्यात येते की, वरील विषया संदर्भात कृषी ग्राहकांची वीज बिले सवलतीच्या दराने आकारल्यानंतर वितरण कंपनीवर पडणा-या आर्थिक भाराची परिमंडळ व ग्राहक संख्यानिहाय माहिती त्वरीत पाठविण्यात यावी. जेणेकरुन शासनाकडून आर्थिक पूर्ततः करण्याकरीता प्रस्ताव पाठविण्यास मदत होईल.

३) मुख्य महाव्यवस्थापक (सांघिक वित्त), महावितरण, मुंबई.

**प्रत रवाना :- प्रेषण यादीप्रमाणे**